30 MAY 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाकडे व्यावसायिक अभ्यासक्रमांची मागणी वाढली

## ■ कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत ७४ नवे प्रस्ताव ■ ४ वर्षांत नव्या २० महाविद्यालयांची भर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पारंपरिक शाखांमधून शिक्षण घेतल्यानंतर नोकरीच्या संधींची मर्यादा लक्षात घेऊन गेल्या काही वर्षांत विद्यार्थ्यांचा कल व्यावसायिक शिक्षणाकडे वाढत आहे. स्कील डेव्हलपमेंट, स्टार्टअप या क्षेत्रात विद्यार्थ्यांना नव्या संधी खुणावत आहेत. परिणामी, शिवाजी विद्यापीठाच्या बृहत् आराखड्यातही याचे प्रतिबिंब उमटले आहे. विद्यापीठाच्या अखत्यारित येणाऱ्या कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांत व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या अभ्यासक्रमांना मागणी वाढली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नव्याने ७४ स्थळबिंदू प्रस्तावित केले असून, प्रत्येक जिल्ह्यांत १५, तर प्रत्येक तालुक्यात २४ स्थळबिंदूंची वाढ करण्याची तरतूद केली आहे.

> नोकरी व स्वतंत्र व्यवसायाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणातील पदवीला पसंती देत आहेत. व्यावसायिक शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल ओळखून त्यांना सुविधा देण्यासाठी बृहत् आराखड्यात व्यावसायिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमांचे नवे स्थळबिंदू वाढवण्याची तरतूद करण्यात आली. अधिसभेची मान्यता मिळाल्याने आता या प्रस्तावावर काम सुरू होणार असून, याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.
>
> **– डॉ. पी. एस. पाटील, प्र. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २०२४ ते २९ या पंचवार्षिक बृहत् आराखड्याला अधिसभा सदस्यांनी मंजुरी दिली आहे. या आराखड्यात व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नव्या स्थळबिंदूंची माहिती प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली. भविष्यात करिअर संधींच्या दृष्टीने विद्यार्थ्यांकडून व्यावसायिक अभ्यासक्रमांची निवड केली जात आहे. विद्यापीठाच्या अखत्यारित येणाऱ्या कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांत विद्यार्थ्यांना त्यांच्या राहत्या परिसरात शिक्षणाची सुविधा मिळावी, यासाठी नवे स्थळबिंदू प्रस्ताव मांडण्यात आले. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात संलग्नित कॉलेजची संख्याही गेल्या चार वर्षांत २० इतकी झाली आहे. निकषानुसार दर १५ किलोमीटर अंतराच्या बाहेर नवे कॉलेज मंजूर करण्याच्या नियमांचे पालन करून विद्यापीठ संलग्नित २० महाविद्यालयांची भर पडली आहे. आता यंदाच्या बृहत् आराखड्यात शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांत ७४ नव्या स्थळबिंदूंना मान्यता मिळाल्याने विद्यार्थी राहात असलेल्या परिसरात व्यावसायिक शिक्षणाचीही सुविधा उपलब्ध होणार आहे. सध्या विद्यापीठांतर्गत १३८ अनुदानित महाविद्यालये असून, त्यापैकी १२३ पारंपरिक, तर १५ व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश असलेली महाविद्यालये आहेत. १४८ विनाअनुदानित महाविद्यालयांपैकी ७१ कॉलेज पारंपरिक अभ्यासक्रमांची असून, उर्वरित ७७ कॉलेज व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी कार्यरत आहेत.

### जिल्हानिहाय स्थळबिंदूंचा तपशील

**कोल्हापूर जिल्हा**

- ■ पारंपरिक अभ्यासक्रम १०,
- ■ व्यावसायिक अभ्यासक्रम ३९

**सांगली जिल्हा**

- ■ पारंपरिक अभ्यासक्रम ४
- ■ व्यावसायिक अभ्यासक्रम २३

**सातारा जिल्हा**

- ■ पारंपरिक अभ्यासक्रम १
- ■ व्यावसायिक अभ्यासक्रम १२

30 MAY 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एम. पी. कदम : कुशल, सहृदयी प्रशासक



**कुशल व सहृदयी प्रशासक म्हणून ओळख असणारे शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव एम. पी. कदम प्रदीर्घ सेवेनंतर शिवाजी विद्यापीठातून दि. ३१ मे २०२३ रोजी सेवानिवृत्त होत ओहत. यानिमित्त...**

एम. पी. कदम यांचे शिराळा तालुक्यातील मांगले हे मूळ गाव. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावीच झाले, तर महाविद्यालयीन शिक्षण वारणा महाविद्यालय वारणानगर येथे झाले. एम. कॉम. ही पदव्युत्तर पदवी त्यांनी कॉमर्स कॉलेज कोल्हापूर येथून संपादन केली.

दि. २ फेब्रुवारी १९९१ रोजी त्यांची शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे प्रथम नेमणूक झाली. प्रथम एक महिना त्यांनी पदव्युत्तर प्रवेश, टंकलेखन विभागात सेवा केली. यानंतर त्यांच्या प्रशासकीय सेवेस खऱ्या अर्थाने मराठी विभागापासून सुरुवात झाली. तेथे त्यांना डॉ. गो. मा. पवार, डॉ. ल. रा. नसिराबादकरसारख्या दिग्गज व व्यासंगी मंडळींचे मार्गदर्शन लाभले. सेवेच्या आरंभ काळातच अशा व्यक्तींच्या सान्निध्यात त्यांच्यात कार्यसंस्कृतीचे संस्कार रुजविण्यास मोलाचे ठरले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांच्याकडे घडलेले सदाशिवराव घाटगे (हवालदार) यांनी कदम यांना प्रशासकीय सेवेचे बाळकडू दिले.

प्रशासकीय अधिकारी कसा असावा, याचे एम. पी. कदम हे उत्तम उदाहरण होते. प्रशासकीय खुर्ची यांनी अडवणुकीऐवजी सोडवणुकीसाठी वापरली. ते अत्यंत अभ्यासू, प्रामाणिक, सहृदयी व समजूतदार अधिकारी होते. त्यांचे व्यवस्थापन अत्यंत नेटके होते. प्रशासन अधिकारी म्हणून संबंधित विभागात त्यांचा कार्यशैलीमुळे दबदबा होता. सहकार्य करण्याची वृत्ती हा त्यांचा स्थायीभाव होता. त्यांच्याकडे कामानिमित्त येणाऱ्या व्यक्तीस त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटे. माणसांना अवमानित न करता त्यांच्याकडे कामानिमित्त येणाऱ्या व्यक्तीचे प्रश्न ते आपलेपणाने समजून घेत. त्यांचे काम होईल म्हणून आश्वस्त करीत. त्याला तत्परतेने त्याच्या कामाच्या अनुषंगाने संदर्भ उपलब्ध करून देत. त्यामुळे व्यक्ती चिंतामुक्त व दडपणमुक्त होत असे.

परीक्षा विभागात त्यांनी आठ वर्षे सेवा केली. तत्कालीन परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांचे त्यांना बहुमूल्य मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यामुळे परीक्षा विभागाचे काम निष्कलंक व विनाप्रमाद पार पडले. शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या या कार्याची दखल घेऊन विद्यापीठाच्या वर्धापनदिनी म्हणजे १८ नोव्हेंबर २०१० रोजी तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांच्या हस्ते गुणवंत सेवक पुरस्कार देऊन सन्मानित केले. सांख्यिकी विभागातील त्यांची सेवा विशेष उल्लेखनीय होती. कारण, एस.सी., एस.टी. संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असणारी राजीव गांधी रिसर्च फेलोशिप ही केवळ एम. पी. कदम यांच्या पाठपुरव्यामुळे व प्रयत्नांमुळे एकूण चाळीस विद्यार्थ्यांना प्राप्त झाली. यासाठी तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी विशेष कौतुक केले होते.

सध्या ते संलग्नता टी-१ विभागात प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. अनेक महाविद्यालयीन शिक्षकांचे प्रमोशन कॅम्प उच्चांकाने आयोजित केले गेले. शासनाच्या आदेशानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाच्या आदेशानुसार अशा शिक्षकांना प्रत्येक महिन्याच्या १ ते १० तारखेदरम्यान अर्ज करण्याची सुविधा व प्राचार्यपदाच्या ए. पी. आय. निश्चितीकरणाचेही असंख्य कॅम्प आयोजित केले गेले. त्यांनी विद्यापीठातील अनेक विभागांत आपल्या कुशल कार्यशैलीचा ठसा उमटविला आहे. त्यामुळे त्यांनी सेवा बजावलेल्या प्रत्येक विभागात त्यांना आदर व सन्मान लाभला. त्या-त्या विभागातील कर्मचाऱ्यांशी त्यांचे सलोख्याचे संबंध राहिले. आपल्या विभागातील सेवकांना समजून घेऊन मृदू संवादातून त्यांना कार्यप्रवण करण्याच्या शैलीमुळे कामाचा निपटारा झटपट होत असे. आपणास प्रशासकीय अधिकारी म्हणून घडविण्यात ज्यांचा मोलाचा वाटा आहे, त्यामध्ये माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, विद्यमान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू मा. डॉ. पी. एस. पाटील यांचा ते नम्रतापूर्वक उल्लेख करतात. तसेच पूर्ण सेवाकाळात अडीअडचणी व सुख-दुखामध्ये सहकाऱ्यांचे आवर्जून उल्लेख करतात ते म्हणजे एस.के. मोरे, कै. संभाजी तोरस्कर, विष्णू खाडे, विजय साळोखे, शिरगावे, संजय पसारे, संजय कोकाटे व उमेश रायबागकर.

ते इतके सेवानिष्ठ होते की, संपूर्ण सेवाकाळात त्यांनी क्वचितच रजा घेतली असेल. त्यामुळेच ते निवृत्तीच्या शेवटच्या दिवसापर्यंत रजा न घेता सेवेत रूजू होते. अशा या प्रामाणिक कर्मयोग्याला त्यांच्या सेवानिवृत्तीच्या हार्दिक शुभेच्छा.

**- एस. के. मोरे,**
माजी अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ

पुण्यनगरी

# कोवाडच्या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाचा 'कलर ॲवॉर्ड'

**हलकर्णी :** सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील शिवाजी विद्यापीठाचा कलर ॲवॉर्ड कोवाड येथील कला महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंना प्राप्त झाला. महाविद्यालयाचे खेळाडू वल्लभ पाटील आणि किशोर भरमगावडा या खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठ रग्बी संघाकडून अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत कास्यपदक मिळवले, तर क्रीडा शिक्षक प्रा. आर. टी. पाटील यांनी शिवाजी विद्यापीठ क्रॉसकंट्री आणि मैदानी संघाचे कोच म्हणून यशस्वी कामगिरी केल्याबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते ब्लेझर, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी क्रीडा संचालक, डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह संचालक, विद्यार्थी उपस्थित होते. या यशाबद्दल संस्था अध्यक्ष डॉ. ए. एस. जांभळे, सचिव एम. व्ही. पाटील, प्राचार्य डॉ. एम. एस. पवार आदींनी अभिनंदन केले.

लोकमत

# विजय ककडे यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. विजय ककडे यांचे 'वित्तीय साक्षरता व स्वेच्छा निवृत्ती' या विषयावर आज मंगळवारी दुपारी १२ वाजता व्याख्यान आहे. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे असणार आहेत.

पुढारी

# डॉ. विजय ककडे यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजय ककडे यांचे 'वित्तीय साक्षरता व स्वेच्छानिवृत्ती' या विषयावर दि. ३० रोजी दुपारी १२ वाजता व्याख्यान आयोजित केले आहे. अर्थशास्त्र विभागातर्फे अर्थ साक्षरता उपक्रमांतर्गत हे व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे असणार आहेत. उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

पुण्यनगरी

# डॉ. विजय ककडे यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने अर्थ साक्षरता उपक्रमांतर्गत प्रा.डॉ. विजय ककडे यांचे वित्तीय साक्षरता व स्वेच्छानिवृत्ती या विषयावर व्याख्यान होणार आहे. मंगळवार, दि. ३० मे रोजी दुपारी १२ वाजता व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे असणार आहेत, तर उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल व उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

पुढारी

# ३१ हजार ३४४ विद्यार्थ्यांनी दिली पदवी अभ्यासक्रम परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेंतर्गत सोमवारी ३१ हजार ३४४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने २५ मेपासून पदवीच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ कॉमर्स, बॅचलर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, बॅचलर ऑफ डिझाईन, बॅचलर ऑफ ड्रेस मेकिंग, बॅचलर ऑफ कॉमर्स बँकिंग आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे झाल्या. भरारी पथकाने जिल्ह्यातून १५ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद केली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

सकाळ

# पदवी परीक्षेत सापडले पंधरा कॉपीबहाद्दर

## शिवाजी विद्यापीठाच्या भरारी पथकाची कारवाई

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च- एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. त्यामध्ये सोमवारी विद्यापीठाच्या भरारी पथकाने कोल्हापूर जिल्ह्यातील विविध केंद्रांवर कारवाई केली. त्यामध्ये १५ विद्यार्थी कॉपी (गैरप्रकार) करताना सापडले. त्यांच्यावर परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई होणार आहे.

बी. कॉम., बी. ए., कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, डिझाईन, आर्टस अँड बॅचलर ऑफ एज्युकेशन, आर्टस् (ड्रेस मेकिंग अँड फॅशन को-ऑर्डिनेशन), कॉमर्स बँक मॅनेजमेंट, सोशल वर्क, बी. कॉम (आयटी), बी. ए. डिफेन्स स्टडी, इंटेरियर डिझाईन या अभ्यासक्रमांच्या सोमवारी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विविध केंद्रांवर परीक्षा झाली. त्यासाठी एकूण ३१३४४ विद्यार्थी उपस्थित होते. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्यात आल्या. कॉपी प्रकरणांची नोंद भरारी पथकांनी परीक्षा प्रमाद समितीकडे केली असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. दरम्यान, या परीक्षा २५ मे पासून सुरू झाल्या आहेत. त्यात विद्यापीठ कार्यक्षेत्रात कॉपी करताना पहिल्या दिवशी १५ विद्यार्थी, दुसऱ्या दिवशी ५ आणि शनिवारी १४, तर सोमवारी १५ जणांना भरारी पथकाने पकडण्याची कारवाई केली.